सदर पत्राच्या अनुषंगाने दि.०६/०२/२०२३ रोजी IIT मुंबई यांनी त्रयस्थ परिक्षण करणे करीता बायोमायनिंग कामाच्या खर्चाच्या ०१% रक्कम + १८% GST आकारण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

मे. IIT मुंबई यांना बायोमायनिंग करण्याकामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी नेमणूक करणे व याकामी येणारा खर्च बायोमायनिंग करणे या कामी येणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०१% रक्कम + १८% GST अदा करणेस अदा करावी लागणार आहे सदर कामी होणारा खर्च सन २०२२-२३ आर्थिक वर्षाच्या "बायोमायनिंग करणे" या लेखाशीर्षाकातुन करण्यात येणार आहे.

मे. IIT मुंबई यांना बायोमायनिंग करणे या कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी नेमणूक करणे व त्रयस्थ परिक्षण करणे करीता अदा करावयाची फी बायोमानिंग करणे या कामी होणाऱ्या खर्च रकमेच्या ०१% रक्कम + १८% GST अदा करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये मान्यतेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता मिळण्यास व सदर कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध
करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास [illegible] म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(34)

**प्रशासकीय ठराव क्र. १०१ दिनांक १५/०६/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिका उत्तन येथील जुन्या असलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) प्रक्रिया करणे कामाचे त्रयस्थ परिक्षण (Third party Audit) करणे करिता IIT मुंबई यांची नेमणुक करणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका उत्तन येथील जुन्या असलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) प्रक्रिया करणे कामाचे त्रयस्थ परिक्षण (Third party Audit) करणे करिता IIT मुंबई यांची नेमणुक करणे व त्रयस्थ परिक्षण करणे या कामी अदा करावयाची फी ही बायोमानिंग करणे या कामाच्या होणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०१% रक्कम + १८% GST अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

F:\Ghankchra prakalpa vibhag\२०२३-२४\GHANKACHRA PRAKALPA VIBHAG\८. MAHASABHA THARAV\३. IIT Bombay (Third Party Audit).doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**// घनकचरा व्यवस्थापन //**

**प्रशासकिय ठराव दिनांक** १५ / ०६ **/२०२३ रोजी** सायं. ४.३० **वाजता**

**विषय क्रमांक - (  )** **मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज**
१०२
उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी इर्नट मटेरीयल सपाटीकरण करणे करीता पोकलन, जेसीबी चेन डोझर, डंम्पर, टोरस मजुर इ. भाड्याने घेणे, लिचेट प्रक्रिया करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

## कार्यालयीन प्रस्तावना

मौजे. उत्तन येथील घनकचरा प्रकल्पातील शिल्लक इर्नट उचलणे कामी डंम्पर पुरवठा करणेकामी जा.क्र.मनपा/साबां/३९०२/२०१९-२० दि.२२/०७/२०१९ मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.०९/०७/२०१९ ते दि.०९/०७/२०२६ पर्यंत आहे.

सदर कामाकरीता मा. विशेष महासभा ठराव दि. २०/०२/२०२० ठराव क्र.१०४ अन्वये रु.१,५०,००,०००/- इतकी आर्थिक व प्रशासकिय मान्यता दिलेली होती. सदर कामी मा. विशेष महासभा मध्ये मान्य करण्यात आलेला अंदाजित खर्च संपुष्टात आला आहे. तरी सद्यस्थितीमध्ये उर्वरीत कामांसाठी पुढील एका वर्षाकरीता दि.३०/०८/२०२४ पर्यंत अंदाजे रु.१,१०,००,०००/- खर्च होणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | लेखाशिर्षक |
|---|---|---|---|
| १. | उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी इर्नट मटेरीयल सपाटीकरण करणे करीता पोकलन, जेसीबी चेन डोझर, डंम्पर, टोरस मजुर इ. भाड्याने घेणे, लिचेट प्रक्रिया करणे.<br>**अंदाजित खर्च -**<br>**सुधारीत अंदाजित खर्च -** | <br><br>रु.१,५०,००,०००/-<br>**रु.२,६०,००,०००/-** | इर्नट उचलणे/ कचरा सपाटीकरण/ लँडफिल्ड |

सदर खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** १०२ **दिनांक** १५/०६/२०२३

उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी इर्नट मटेरीयल सपाटीकरण करणे करीता पोकलन, जेसीबी चेन डोझर, डंम्पर, टोरस मजुर इ. भाड्याने घेणे, लिचेट प्रक्रिया करणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध करुन देण्यात ... सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
... विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

३७०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन उत्तन येथील घनकचरा प्रकल्प ठिकाणी इर्नट मटेरीयल सपाटीकरण करणे करीता पोकलन, जेसीबी चेन डोझर, डंम्पर, टोरस मजुर इ. भाड्याने घेणे, लिचेट प्रक्रिया करणे या कामांसाठी उर्वरीत पुढील एका वर्षांकरीता दि.३१/०८/२०२४ पर्यंत एकुण रु.,१,१०,००,०००/- होणाऱ्या खर्चास सुधारीत तसेच मे. गुरुजी इंन्फ्ररस्टक्चर प्रा. लि. यांचेकडील मंजुर दराने काम करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

(३८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दि.१५/६/२०२३ रोजी सायं. ४.३० वाजता.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

**विषय क्र. ( ) :-** १०३ **मा. आयुक्त मोहदयाकडील कामकाज.**
**सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके मंजुर दरानुसार खरेदी करणेस मान्यात देणे.**
**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभगााकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके निविदा मागवून खरेदी करणेस मा. महासभा दि.२३/०६/२०२१, ठराव क्र. २० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. आयुक्त यांनी निविदा मागविणेस दि.०२/०८/२०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. या अनुषंगाने दि.०५/०८/२०२१ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.२५/०८/२०२१ रोजी ई-टेंडरव्दारे २ वर्षाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांचे वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरास मा. स्थायी सभेने यांनी दि.२९/०९/२०२१ रोजी ठराव क्र. ८६ ने मंजुरी दिलेली आहे.

सद्यसिथतीत मा. लोकप्रतिनिधींचा कार्यकाल संपला असल्याने मा. आयुक्त हे प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. डासनाशके व अळीनाशके संपत आलेली आहेत. त्याचप्रमाणे डासनाशके व अळीनाशके निविदेची मुदत सप्टेंबर २०२३ पर्यंत असून नविन निविदा काढल्यास १० ते १५% दर वाढण्याची शक्यता असून. सद्यस्थितीत मंजुर दरानुसार खरेदी केल्यास पालिकेच्या पैशांची बचत होणार आहे.

सद्यस्थितीत १२० औषध फवारणी कामगारांमार्फत ३२ मिनी टेम्पोवरील जेट स्प्रे मशिनव्दारे सकाळी ७.०० ते दुपारी १२.३० व १२० स्प्रे पंपाव्दारे दुपारी १.०० ते दुपारी ३.०० या वेळेत शहरात डासनाशके व अळीनाशके औषधफवारणीचे काम चालू असते. सद्या पावसाळा सुरु होत असल्याने साथींच्या रोगांची शक्यता उदभवू शकते. सद्यस्थितीत डासनाशक व अळीनाशक औषधांचा साठा संपत आलेला आहे. त्यामुळे डास नियंत्रण कार्यक्रमात अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून खालील प्रमाणे डासनाशके व अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदर डासनाशके व अळीनाशके खरेदी करणेकामी रु. ५,०४,३१,१५०/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "एकात्मिक डासनिर्मुलन योजना / ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षाखालील मंजूर रु. १४,००,००,०००/- या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमूद प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. (१०३) दि.१५/६/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभगााकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके मंजूर दरानुसार खरेदी करणेस मान्यात देणेकामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता आवश्यक रु. ५,०४,३१,१५०/- इतक्या रक्कमेचे डासनाशके / अळीनाशके मंजूर दरानुसार खरेदी करणेस व कार्यादेश देणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यात देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागानी विहित पद्धतीने करावी.

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

C:\Users\HP\Downloads\Goshwara - डासनाशके व अळीनाशके - 09.06.2023.docx

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीय सभा दि. १५/०६/२०२३

## // ठराव //

**विषय क्र ( १०४ ) :**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिरा रोड येथे सेक्टर ३, ७ व ८ येथे कार्यान्वित सी. सी. टी. व्ही. यंत्रणेची देखभाल व दुरूस्ती करणे.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिरा रोड येथे सेक्टर ३, ७ व ८ येथे कार्यान्वित सी. सी. टी. व्ही. यंत्रणेची देखभाल व दुरूस्ती करणे कामी दि. ०८/०२/२०२३ रोजी निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार मुदतीमध्ये प्राप्त निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या तांत्रिक छाननीनुसार पात्र निविदाधारक मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा.लि., मे. न्यू फील्ड व मे. युटीलिटी एंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा उघडणेकरीता मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. निविदेचा तांत्रिक छाननी अहवाल संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेपासून कोणत्याही निविदाधारकाने हरकत नोंदविली नसल्याने पात्र निविदाधारकांचा दराचा लिफाफा दिं. २३/०३/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता उघडण्यात आला.

विभागाने प्रस्तावित केलेल्या कामामध्ये यापुर्वी कार्यान्वित केलेल्या कामाकरीता दि. २१/१२/२०१८ रोजी सदरची यंत्रणा कार्यान्वित करून पहिले वर्ष विनामुल्य देखभाल दुरूस्तीसह पुढील २ वर्षाकरीता देखभाल दुरूस्ती करणे कामी कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार सदर कामाचा देखभाल व दुरूस्ती कालावधी दि. २०/१२/२०२१ रोजी संपुष्टात आलेला आहे. सदर यंत्रणेस ०५ वर्षे होत आली असून त्यामधील कार्यादेश दिलेल्या १२० कॅमेऱ्यांपैकी ५३ कॅमेरे पुर्णपणे नादुरूस्त झालेले असून याव्यतिरीक्त १२ PoE Switches, १३ Pair Media Converter, १४ MCB नादुरूस्त झाल्याने बदलणे आवश्यक आहे. याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाने काँक्रीट रस्त्याचे काम सुरू असताना जेसीबीने खोदकाम करताना तुटल्यामुळे १२८० मीटर लांबीची फायबर, ४४७ मीटर CAT-6 केबल, ८५६ मीटर रोप वायर पुन्हा अंथरणे आवश्यक आहे. यासर्व कामास अंदाजे रू. १२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच उर्वरीत कॅमेरे व यंत्रणांची किरकोळ दुरूस्ती व सर्व्हिसिंग करणे व पुढील एक वर्षाकरीता सदरची यंत्रणा देखभाल व दुरूस्ती करणे असा एकूण रू. १८,४८,००८/- रकमेचा प्रस्ताव विभागामार्फत सादर करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि -१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम ४५२ अ चा (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(४६०)

अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. करीता उपरोक्त कामी मे. न्यू फिल्ड यांनी सादर केलेले दर बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने प्रशासकीय ठराव करून निविदाकार मे. न्यू फिल्ड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. १०४ दि. १५/०६/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिरा रोड येथे सेक्टर ३, ७ व ८ येथे कार्यान्वित सी. सी. टी. व्ही. यंत्रणेची देखभाल व दुरूस्ती करणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या १(अ) व १(ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून खालील प्रमाणे प्राप्त दरांचे अवलोकन करण्यात आले.

| अ. क्र. | कामाचे नाव व अंदाजपत्रकीय रक्कम | प्राप्त दर (वस्तू व सेवा कर वगळून) | | |
|---|---|---|---|---|
| | | मे. युटीलिटी एंटरप्रायजेस | मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा.लि. | मे. न्यू फील्ड |
| ०१ | Comprehensive Maintenance of CCTV System at Mira Road Sector 3,7 and 8 in MBMC Area<br>Estimated Amount :<br>Rs. 18,48,008/-<br>(Excluding GST) | +5%<br>(Rs.19,40,408/-) | -0.1%<br>(Rs.18,46,159/-) | -6.11%<br>(Rs.17,35,095/-) |
| | शेरा | L-3 | L-2 | L-1 |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. न्यू फिल्ड यांनी सादर केलेले दर बाजारभावाशी तुलना केली वाजवी असल्याने त्यांचे दरांस मंजुरी देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(69)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दिनांक १५ / ०६ / 2023 रोजी सायं. ४.३० वाजता.**

**विषय क्र. ( १०५ )** :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज
मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला ते शिवसृष्टीकडे जाणारा रस्ता तयार करणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर किल्ला असून सदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक असून घोषित असून पुरातत्व विभागाने सदर किल्ला महाराष्ट्र वैभव- राज्य संरक्षित स्मारक योजनेतंर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे संगोपनार्थ दिलेला आहे. सदर किल्ल्यातील दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

घोडबंदर किल्ला व परिसर राज्य संरक्षित प्रमुख केलेल्या 7 हेक्टर 60 आर.5 गुंठे इतक्या जागेपैकी 9 एकर जागेत शिवसृष्टी प्रकल्प तयार करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत शिवसृष्टीकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे घोडबंदर किल्ल्यालगत शिवसृष्टीकडे जाणारा जागेतुन रस्ता तयार करणेसाठी मा.श्री.प्रताप सरनाईक, आमदार सतत पाठपुरावा करीत आहेत. सदर रस्ता तयार करणेसाठी जागा ही उंच असल्यामुळे सदर ठिकाणी खोदाई करुन आर.सी.सी.रिटेनींग वॉल बांधणी करावी लागणार आहे. सदर रस्त्याकरीता प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन लेव्हल घेऊन रु.6,89,02,706/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामी सन 2023-24 "नविन रस्ते / डी.पी.रोड बांधकाम" या लेखाशिर्षकातंर्गत रु.3000.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. १०५ दिनांक १५/ ०६ /2023

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर किल्ला असून सदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक असून घोषित असून पुरातत्व विभागाने सदर किल्ला महाराष्ट्र वैभव- राज्य संरक्षित स्मारक योजनेतंर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे संगोपनार्थ दिलेला आहे. सदर किल्ल्यातील दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

घोडबंदर किल्ला व परिसर राज्य संरक्षित प्रमुख केलेल्या 7 हेक्टर 60 आर.5 गुंठे इतक्या जागेपैकी 9 एकर जागेत शिवसृष्टी प्रकल्प तयार करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत शिवसृष्टीकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे घोडबंदर किल्ल्यालगत शिवसृष्टीकडे जाणारा जागेतुन रस्ता तयार करणेसाठी मा.श्री.प्रताप सरनाईक, आमदार सतत

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध
करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(862)

पाठपुरावा करीत आहेत. सदर रस्ता तयार करणेसाठी जागा ही उंच असल्यामुळे सदर ठिकाणी खोदाई करुन आर.सी.सी.रिटेनींग वॉल बांधणी करावी लागणार आहे. सदर रस्त्याकरीता प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन लेव्हल घेऊन रु.6,89,02,706/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामी सन 2023-24 "नविन रस्ते / डी.पी. रोड बांधकाम" या लेखाशिर्षकातंर्गत रु.3000.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. दिलीप ढोले, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन रु.6,89,02,706/- रक्कमेच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

वरील कामाबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दीने करावी.

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-9/VP/2023-24/DK/MT - 07

(४३)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दिनांक १५ / ०६ / 2023 रोजी सायं. ५.३० वाजता.**

**विषय क्र. (१०६)** :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज
मिरारोड (पुर्व) 60.00 मी.विकास आराखड्यातील रस्त्यावर
संग्नाईदेवी जंक्शन बाजुला नाला तयार करणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) संग्नाईदेवी जंक्शन ते अदानी पावर हॉऊस पर्यंत रस्ता व नाल्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु होते. सदर कामाच्या ठिकाणी संग्नाईदेवी जंक्शन पासून 200.00 मी. लांबीचे रस्त्याचे व नाल्याचे काम जागेचा वाद असल्यामुळे झालेले नाही. त्यामुळे सदर ठिकाणी तात्पुरता स्वरुपात कच्चा नाला खोदलेला आहे. सदर नाल्यामधुन संजय गांधी उद्यान परिसरातील तसेच जनतानगर, मांडवीपाडा या सर्व ठिकाणाचे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास मदत होते. त्याकरीता सदर नाल्याचे काम करणे आवश्यक आहे. सदर कामी रु.6,78,56,200/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक होत आहे.

सदर कामी सन 2023-24 "नविन रस्ते / डी.पी.रोड बांधकाम" या लेखाशिर्षकातंर्गत रु.3000.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. १०६ दिनांक १५ / ०६ /2023**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) संग्नाईदेवी जंक्शन ते अदानी पावर हॉऊस पर्यंत रस्ता व नाल्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु होते. सदर कामाच्या ठिकाणी संग्नाईदेवी जंक्शन पासून 200.00 मी. लांबीचे रस्त्याचे व नाल्याचे काम जागेचा वाद असल्यामुळे झालेले नाही. त्यामुळे सदर ठिकाणी तात्पुरता स्वरुपात कच्चा नाला खोदलेला आहे. सदर नाल्यामधुन संजय गांधी उद्यान परिसरातील तसेच जनतानगर, मांडवीपाडा या सर्व ठिकाणाचे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास मदत होते. त्याकरीता सदर नाल्याचे काम करणे आवश्यक आहे. सदर कामी रु.6,78,56,200/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक होत आहे.

सदर कामी सन 2023-24 "नविन रस्ते / डी.पी.रोड बांधकाम" या लेखाशिर्षकातंर्गत रु.3000.00 लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी सदर काम करणे आवश्यक असल्याने सदर कामाच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी श्री.दिलीप ढोले, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन रु.6,78,56,200/- रक्कमेच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

वरील कामाबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दीने करावी.

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-9/VP/2023-24/DK/MT - 06

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध
करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(८८)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकिय ठराव क्र.** १०७ **दिनांक :-** १२/६/2023

**प्रकरण क्रमांक :- (** १०७ **) निविदांना मान्यता देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील निविदेस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले

निविदा सुचना क्र.50/02 (2022-23) दि.10/02/2023 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता शुद्धिपत्रक क्र.1 ते 4 प्रसिद्धिअंती दि.09/05/2023 पर्यंत तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.20/10/2022 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. निविदेच्या सल्लागारामार्फत निविदेची तांत्रिक तपासणी करुन अहवाल दिलेला आहे. त्यानुसार **1. मे. इन्हायरो कंट्रोल प्रा.लि. 2 मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. 3. मे. सुईज इंडिया प्रा.लि.** हे पात्र ठरले आहेत. सदर निविदेचा आर्थिक देकाराचा लिफाफा दि.26/05/2023 रोजी उघडण्यात आलेला असुन **मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांनी अंदाजपत्रक दरापेक्षा 29.92% जास्त दर सादर केलेले असुन सदरचे दर निमत्तम (L1) आहेत. सदर संस्थेकडून दि.29/05/2023 रोजीच्या पत्रान्वये जादाच्या दराबाबत स्पष्टीकरण/समर्थन मागविण्यात आलेले आहे. सदर संस्थेने दि.01/06/2023 रोजी सादर केलेले जादाच्या दराबाबत स्पष्टीकरण/समर्थन यांचे मुल्यामापन करणेकरीता मे. फोर्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड यांना दि.02/06/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिलेली असल्याने मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी सादर केलेल्या जादाच्या दराबाबतचे मुल्यमापन (Evaulation) करुन अभिप्राय मिळणेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दि.02/06/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावाची छाननी करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेला आहे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. मजीप्रा/मु.अ./ठाणे/तांशा-1/1265 दि. 06/06/2023 पत्रानुसार केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांना अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर भुयारी गटार योजना भाग-2 (टप्पा-1) /मुल्यांकीत किंमत परिगणित करण्याबाबत अहवाल देण्यात आला आहे. सदर मुल्यमापन अहवालानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन जून 2021 साली दरसुची प्रसिध्द करण्यात आली आहे. तद्नंतर STP बांधणे व कार्यान्वीत करणेबाबत सुधारीत दरसुची शुध्दीपत्रक क्र. 12 दि.05/12/2022 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर दरसुचीच्या आधारे निविदेतील दराचे मुल्यमापन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केले आहे. तसेच CPHEEO मॅन्युअल तांत्रिक बाबी व NGT च्या मार्गदर्शक तत्वानुसार निविदेतील दराबाबत मुल्यांकन केले आहे. तसेच विषयांकीत योजनेचे तांत्रिक सल्लागार मे. फोर्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, यांनी देखील दि.09/06/2023 रोजी निविदा दराबाबत अहवाल प्राप्त असुन सदर दराबाबत विश्लेषण सादर केले असून निविदा मंजूरीस शिफारस केलेली आहे.

करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत



(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| **निविदेचा तपशील** | **रक्कम (जी.एस.टी.वगळून)** |
|---|---|
| निविदेची मुळ किंमत | रु.147,05,59,013/- |
| निविदाधारकाने सादर केलेले दरानुसार निविदेतील कामाची एकुण किंमत (अंदाजपत्रकापेक्षा 29.92% जास्त दर) | रु.191,05,50,270/- |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुल्यमापन अहवालानुसार कामाची एकुण किंमत (अंदाजपत्रक दरापेक्षा 27.60% जास्त दर) | रु.187,64,12,098/- |
| **निविदाधारकाने वाटाघाटीअंती सादर केलेले दर (अंदाजपत्रक दरापेक्षा 26.95% जास्त दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केलेल्या दरापेक्षा 0.65% ने कमी आहे.)** | **रु.186,68,74,667/-** |

सदर निविदेचा वाढीव खर्च महानगरपालिकेच्या फंडातुन करावा लागणार आहे. भविष्यातील वाढीव सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका भुयारी गटार योजना टप्पा-II (Part-I) या कामाच्या रु. 175.19 कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 योजने अंतर्गत शासनाची प्रशासकीय मान्यता शासन निर्णय अमृत-200/प्र.क्र.320/नवि-33 दिनांक 07 डिसेंबर 2022 रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राप्त झालेली आहे.

सदरच्या सविस्तर प्रकल्प अहवालात एकूण 4 ठिकाणी एकूण 48 द.ल.ली. क्षमतेची मलनि:सारण केंद्रे बांधणे तसेच 5 द.ल.ली. क्षमतेचे सांडपाणी पुर्नप्रक्रिया केंद्र उभारणे व अनुषंगीक कामांचा समावेश आहे. करीता सदरचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

**सदर कामाकरीता मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. या ठेकेदारांनी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा रु.26.95% जास्त दर (रु.186,68,74,667/- जी.एस.टी.वगळून) सादर केलेले आहेत. सदरचे दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केलेल्या दरापेक्षा 0.65% ने कमी आहेत.** तरी, **मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि.** या ठेकेदारांनी सादर केलेले दर वाजवी असल्याने निविदा समितीची शिफारस केलेली आहे.

सदर कामाकरीता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून)** | **निविदाधारकाचे नाव** | **मंजुरीसाठी प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजना टप्पा-2 (भाग-1) (Tender Id No.- 2023_MBMC_873272_1) (निविदा सुचना क्र.50/02) | रु.147,05,59,013/- | **1.मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि.** | **29.92%जास्त दर** |
| | | | 2. मे. सुईज इंडिया प्रा.लि. | 38.70%जास्त दर |
| | | | 3.मे.इन्हायरो कंट्रोल प्रा.लि. | 41.00%जास्त दर |

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत



(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(४६)

सदर कामाकरीता दर वाटाघाटीअंती प्राप्त दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून) | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी प्रस्तावित दर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केल्यानुसार प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजना टप्पा-2 (भाग-1) (Tender Id No.-2023_MBMC_873272_1) (निविदा सुचना क्र.50/02) | रु.147,05,59,013/- | मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. | 29.92% जास्त दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 26.95% जास्त दर | 0.65% कमी दर |

वरील निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार **मे. एस.एम.सी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. या ठेकेदारास दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 26.95% जास्त या दरास म्हणजेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केलेल्या दरापेक्षा 0.65% कमी दर तसेच सदर कामाकरीता अनुज्ञेय असलेल्या जी.एस.टी.सहीत मान्यता देत आहे.** पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-** पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकिय ठराव क्र. १०८** **दिनांक :- १८/७/२०२३**

**प्रकरण क्रमांक :- ( १०८ )** **निविदांना मान्यता देणे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील निविदेस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले

निविदा सुचना क्र.50/01 (2022-23) दि.10/02/2023 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता शुद्धिपत्रक क्र.1 ते 4 प्रसिद्धिअंती दि.09/05/2023 पर्यंत तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.10/10/2022 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. निविदेच्या सल्लागारामार्फत निविदेची तांत्रिक तपासणी करुन अहवाल दिलेला आहे. त्यानुसार **1. मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. 2. मे. आर.बी.क्रिष्णानी** हे पात्र ठरले आहेत व **3. मे. इंद्रदिप कंस्ट्रक्शन कंपनी** हे अपात्र ठरले आहेत. सदर निविदेचा आर्थिक देकाराचा लिफाफा दि.26/05/2023 रोजी उघडण्यात आलेला असुन **मे. इगल इन्फ्रा इंडिया लि.** यांनी अंदाजपत्रक दरापेक्षा 17.91% जास्त दर सादर केलेले असुन सदरचे दर निमत्तम (L1) आहेत. सदर संस्थेकडून दि.29/05/2023 रोजीच्या पत्रान्वये जादाच्या दराबाबत स्पष्टीकरण/समर्थन मागविण्यात आलेले आहे. सदर संस्थेने दि.01/06/2023 रोजी सादर केलेले जादाच्या दराबाबत स्पष्टीकरण/समर्थन यांचे मुल्यामापन करणेकरीता मे. फोर्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड यांना दि.02/06/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिलेली असल्याने मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. यांनी सादर केलेल्या जादाच्या दराबाबतचे मुल्यमापन (Evaulation) करुन अभिप्राय मिळणेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दि.02/06/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावाची छाननी करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील संदर्भाधित मुल्यांकन अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील बहुतांश ठिकाणचे अरुंद रस्ते त्याकरीता लागणारे वाढीव मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, वाहतुक खर्च तसेच पाईप साठवणूकीसाठी लागणारी जागेचे भाडे, पाईप वाहतुक खर्च, तसेच खोदकामात निघणारे माती वाहतुकीसाठी लागणारे सुधारीत रॉयल्टी चार्जेस इत्यादी बाबत तत्कालीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दरसुची व सद्यस्थितीतील प्रचलीत दर यानुसार सुधारीत परिगणना केली आहे. उक्त सर्व बाबींचा समावेश करुन तांत्रिक दृष्टया महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुल्यमापन अहवाल प्राप्त झाला आहे. **सदर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुल्यमापन अहवालानुसार संदर्भाधिन निविदेतील रक्कम रु.12.19% वाढ संयुक्तीक आहे.**

तसेच सदर योजनेचे सल्लागार मे. फोर्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, यांचा दि.08/06/2023 रोजीचा निविदा दराबाबत अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. यांनी सादर केलेल्या निविदा स्विकृती बाबत शिफारस केलेली आहे. मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. यांनी सादर केलेले निविदा दर 17.91% अधिक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुल्यमापन अहवालानुसार सदर निविदा दर मुल्यांकन किंमतीच्या 5.10% अधिक आहेत.

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध
करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्राची/अभिलेखाची सत्यप्रत



(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| निविदेचा तपशील | रक्कम (जी.एस.टी.वगळून) |
|---|---|
| निविदेची मुळ किंमत | रु.423,54,37,231/- |
| निविदाधारकाने सादर केलेल्या दरानुसार निविदेतील कामाची एकुण किंमत (अंदाजपत्रकापेक्षा 17.91% जास्त दर) | रु.499,40,04,039/- |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुल्यमापन अहवालानुसार कामाची एकुण किंमत (अंदाजपत्रक दरापेक्षा 12.19% जास्त दर) | रु.475,17,25,105/- |
| **निविदाधारकाने वाटाघाटीअंती सादर केलेले दर (अंदाजपत्रक दरापेक्षा रु.11.88% जास्त दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुल्यांकन केलेल्या दरापेक्षा 0.31% ने कमी आहे.)** | **रु.473,86,07,174/-** |

सदर निविदेचा वाढीव खर्च महानगरपालिकेच्या फंडातुन करावा लागणार आहे. उक्त नमूद सर्व बाबींचा अहवाल विचारात घेता मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. यांनी सादर केलेला निविदा दर वाजवी असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापी सदर दर वाटाघाटी करुन निविदाकाराने कमी केल्यास सदर निविदा स्विकृतीस्तव सादर करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन 2054 पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणेसाठी शासनाने सुर्या धरण प्रकल्पातून मिरा भाईंदर शहरासाठी 218 द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मंजूर केलेले आहे. सदरचे 218 द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर शहरापर्यंत पोहचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मिरा भाईंदर व वसई-विरार महानगरपालिकेसाठी 403 द.ल.ली. पाणी पुरवठा योजना राबवीत आहे. सदर कामाच्या रु.516.78 कोटी किंमतीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास शासन निर्णय क्रमांक अमृत-2022/प्र.क्र. 268/नवी-33 दि.02/11/2022 रोजी मान्यता मिळाली आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा पाणी प्रश्न् कायमचा मार्गी लागणार आहे. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने तातडीने करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कामाकरीता **मे. इगल इन्फ्रा इंडिया लि.** या **ठेकेदारांनी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा रु.11.88% जास्त दर (रु.473,86,07,174/- जी.एस.टी.वगळून) सादर केलेले आहेत. सदरचे दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केलेल्या दरापेक्षा 0.31% ने कमी आहेत.** तरी, **मे. इगल इन्फ्रा इंडिया लि.** या ठेकेदारांनी सादर केलेले दर वाजवी असल्याने निविदा समितीची शिफारस केलेली आहे.

सदर कामाकरीता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था. (Tender Id No.- 2023_MBMC_873079_1) (निविदासुचना क्र.50/01) | रु.423,54,37,231/- | **1. मे. इगल इन्फ्रा इंडिया लि.** | 17.91% जास्त दर |
| | | | 2. मे. आर.बी. क्रिष्णानी | 21.60% जास्त दर |

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत



(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(४९)

सदर कामाकरीता दर वाटाघाटीअंती प्राप्त दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी.वगळून) | निविदाधारकाचे नाव | मंजुरीसाठी प्रस्तावित दर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केल्यानुसार प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था. (Tender Id No.-2023_MBMC_873079_1) (निविदा सुचना क्र.50/01) | रु.423,54,37,231/- | मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. | 17.91% जास्त दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 11.88% जास्त दर | 0.31%कमी दर |

वरील निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) अन्वये निविदा दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व (1ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73(क) नुसार **मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. या ठेकेदारास वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 11.88% जास्त या दरास म्हणजेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुल्यांकन केलेल्या दरापेक्षा 0.31% कमी दर तसेच सदर कामाकरीता अनुज्ञेय असलेल्या जी.एस.टी.सहीत मान्यता देत आहे.** पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-** पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कादपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\NS -50-01 & 50-02\NS- 50-01 & 50-02\Tharav - Nivida Manjuri - Standing - NS -50-01.doc